श्रीसांई सच्चरित. श्री हेमाडपंतकृत.

# अध्याय ५२ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरूसाईनाथाय नमः ॥

आतां करूं सिंहावलोकन । तदनंतर ग्रंथ संपूर्ण ॥
करूं अवतरणिका देऊन । सारांश निवेदन ग्रंथाचा ॥
देहीं असतां निज-भक्तांला । वेळोवेळीं जो अनुभव दिधला ॥
त्याचा ग्रंथ ही "साईलीला" । ग्रंथ लिहविला स्मरणार्थ ॥ १ ॥
"साईलीला" परम पवित्र । त्यांतील सच्चरित कथासत्र ॥
बाबा हे निजगुरु चरित्र । इह परत्र प्रबोधक ॥ २ ॥
संग्रहीं ज्या ते असंख्यात । परी व्युत्पत्ती विद्यारहित ॥
करीं धरूनि हेमाडपंत । हें निज सच्चरित लिहविलें ॥ ३ ॥
कांहीं आपण आपुली ख्याती । स्वमुखें शिष्यां श्रवण करविती ॥
तेंही गेलिया निजधामाप्रती । तेंपासून या ग्रंथा स्फूर्ती ॥ ४ ॥
परोपरीच्या वार्ता गहन । सांई जेव्हां करीत कथन ॥
श्रोते होत अत्यंत तल्लीन । भूक तहान विसरत ॥ ५ ॥
जिहीं पाहिलें सांई स्वरूप । हरले तयांचे त्रिविध ताप ॥
ऐसा ज्यांचा तेज प्रताप । साद्यंत केविं वर्णावा ॥ ६ ॥

---

१ थेट अवतरणिका दिलेली दिसत नाहीं. परंतु पहिल्याच ओवींत अवतरणिका देऊं असें लिहिलें आहे.

ऐसा साई उदार कीर्ति । जे जे लागले त्याच्या भक्तीं ॥
तयाचिया उद्धारासति । ठेविली निजख्याती लिहून ॥ ७ ॥

गोदावरीचें पवित्र स्नान । पुढें घेवोनियां समाधी दर्शन ।
करावें हें सच्चरित श्रवण । त्रिताप शमन होतील ॥ ८ ॥

सहज बोलतां जयाच्या गोष्टी । नकळत पडे परमार्थ मिठी ॥
प्रेमें घालाया ग्रंथीं दिठी । पापांच्या कोटी निरसतील ॥ ९ ॥

जन्म मरण यातायाती । चुकवाव्या जे मनें इच्छिती ॥
तींहीं अखंड स्मरण भक्ती । गुरुपदासक्ति जोडावी ॥ १० ॥

प्रमाद मिथ्या ज्ञानाचें कारण । आत्मरुपीं अनवधारण (?) ॥
जेथूनि उद्भवे जननमरण । सर्वानर्थ निदान जें ॥ ११ ॥

मोह म्हणतें मिथ्या ज्ञान । अनात्म ठायीं आत्माभिमान ॥
तोच मृत्यु विद्वज्जन । लक्षण करितात ॥ १२ ॥

साई कथासागर मंथन । करितां साई कथा कथन ॥
गोडी जिची नित्य नूतन । श्रोत्यांचें अधःपतन चुकेल ॥ १३ ॥

साईचें गुणमय स्थूळ (?) स्वरूप । त्याचें करितां ध्यान अमूप ॥
प्रकटेल सूक्ष्मतम आत्मस्वरूप । होउनि लोप सगूणाचा ॥ १४ ॥

न होतां सगुणरूपीं प्रवेश । कळेना आत्म योतीश (?) ॥
परब्रह्म जें निर्विशेष । दुर्बोध निःशेष जाणावया ॥ १५ ॥

जेणें दाऊनि आपुली पाउलें । प्रेमें निजभक्त भाविक बळें ॥
देहींच असतां विदेही केलें । परमार्था लाविलें अकळपणें ॥ १६ ॥

सागरासि जेव्हां देतां आलिंगन । सरिता विसरते सरितापण ॥
तैसा भक्त येतां शरण । नुरविसी दुजेपण भक्तांचें ॥ १७ ॥

दोनी दीप एक होती । एकमेकां आलिंगन देती ॥
तात्काळ हारपे द्वैतस्थिती । एकचि दीप्ति एकत्वें ॥ १८ ॥

कर्पूर सोडूनि त्याची द्युति । सूर्या सोडूनि त्याची दीप्ति ॥
कनका सोडूनि त्याची कांती । राहिल का निश्चिंती वेगळी ॥ १९ ॥
जैसीं सागरीं रिघे सरिता । सागरचि होऊनि ठाके तत्वतां ॥
अथवा कवण सागरीं रिघतां । सागरीं समरसता तात्काळ ॥ २० ॥
तेणेंपरी येतां साईपदीं शरण । भक्तामाजी नुरे दुजेपण ॥
भक्त होती समसमान । त्यागुनि मी पण आपुलें ॥ २१ ॥
जागृतिस्वप्न अथवा सुषुप्ति । तिही माजील कवण्याही स्थिती ॥
जाहलिया साईमय वृत्ति । संसारनिवृत्ति काय दुजी ॥ २२ ॥
असो आतां येऊन लोटांगणासीं । हेचि मागतों पायांपाशीं ॥
तुजवीण अन्यत्रीं या वांछेसी । जाऊं न देशी एकेसी ॥ २३ ॥
ब्रह्मादिस्तंबपर्यंत । घट मठीं सबाह्य आकाशवत ॥
परिपूर्ण जो सर्व भूतांत । विषमता यत्किंचित जो नेणें ॥ २४ ॥
सकळ भक्त ज्या समसमान । जो नेणें मानापमान ॥
प्रियाप्रिय नेणें जयाचें मन । जया न विषमपण तिळभर ॥ २५ ॥
शरण रिघूं त्या साई समर्था । जो निजस्मरणें दे सर्वार्था ॥
त्याच्या चरणीं अखंड माथा । ठेवूनी कृतार्था होऊं कीं ॥ २६ ॥
आतां श्रोते सज्जन भक्तप्रवर । सर्वां माझा नमस्कार ।
तुम्ही थोर मित्राचार । विनवितों सादर तें परिसा ॥ २७ ॥
मासोमासीं काढुनि अवसर । कथा परिसल्या ज्या हा काळवर ॥
त्या जयाच्या तयाचा विसर । नेदा क्षणभर पडावया ॥ २८ ॥
आपण जों जों सप्रेम चित्ता । परिसतां या साईच्या कथा ॥
तों तों मी जो येथील वक्ता । तया उल्हासतां दे साई ॥ २९ ॥
तैसें जैं श्रोते न दत्तावधान । वक्ता न केव्हांही सुप्रसन्न ॥
परस्परांच्या प्रसन्नतेवीण । वांऊगाशीण श्रवणाचा ॥ ३० ॥

परम दुस्तर भवसागर । उसळती मोहाच्या लाटा अनिवार ॥
आदळति अविचार तटावर । पीडिती तरूवर धैर्यांचे ॥ ३१ ॥

वाजतो अहंकाराचा वारा । तेणें हा डहुळे सागर सारा ॥
क्रोधद्वेषादि महामगरां । मिळे जैं थारा निर्भयपणें ॥ ३२ ॥

मी माझें हा गजर । वासना विकल्प भंवरे अपार ॥
निंदा असुयादि जेथें तिरस्कार । असंख्य जलचर तळपती ॥ ३३ ॥

ऐसा जरी हा सागर भयंकर । अगस्तीरूपें प्राशी गुरूवर ॥
तयाचे जे चरणरज किंकर । तयां न लवमात्र भय त्यांचें ॥ ३४ ॥

म्हणोनि सांई समर्थ सद्गुरू । होऊनियां भवाब्धीचें तारूं ॥
आम्ही जे केवळ कास धरूं । त्यां सर्वांस उतरूं पैलपार ॥ ३५ ॥

महादुस्तर हा भवार्णव । करा साई चरणांची नांव ॥
दावीक निर्भय पैल ठाव । पहा नवलाव निष्ठेचा ॥ ३६ ॥

पाळितां या ऐशा व्रता । भासे न संसार दुःख तीव्रता ॥
लाभ न अन्य येणें परता । सेव्य समर्थता ती हीच ॥ ३७ ॥

साईचरणीं अत्यंत भक्ती । नयनीं कोंदो साईमूर्ती ॥
साईच दिसो सर्वांभूती । ऐसी ही स्थिती भक्तां येवो ॥ ३८ ॥

होऊनियां स्वच्छंदवर्ती । पूर्व जन्मीं पावलों च्युती ॥
आतां तरी लाभो सद्गती । संग निर्मुक्ति ये अर्थीं ॥ ३९ ॥

पाठीसीं असतां श्री समर्थ । कोणीही लावूं न शके हात ॥
ऐसिया निर्धारें जे निर्धास्त । धन्य ते भक्त साईचे ॥ ४० ॥

असो आतां येतें मना । धरूनियां बाबांच्या चरणा ।
करावी तयांस एक प्रार्थना । सकल भक्त जनां कारणें ॥ ४१ ॥

कीं हा ग्रंथ सर्वां घरीं । असावा नित्य पाठांतरीं ।
नियमें प्रेमें पारायण करी । संकटें वारी तयांचीं ॥ ४२ ॥

होवोनियां शुचिर्भूत । प्रेम आणि श्रद्धायुक्त ।
वाचील जो हा साता दिसांत । अनिष्टें शांत तयाचीं ॥ ४३ ॥
तो हा अध्यात्म तंतूनीं विणिला । कृष्णब्रम्ह कथांहीं भरला ।
ब्रम्हात्मैक रसीं तरतरला । अपूर्व उथळला अद्वैतीं ॥ ४४ ॥
या नाथ काव्य नंदनवनीं । बत्तीस खणांचिया वृंदावनीं ॥
या गोड मनोहर सदुद्यानीं । ज्ञानी अज्ञानी रमताती ॥ ४५ ॥
करितां हें सच्चरित श्रवण । अथवा नेमें पारायण ॥
करितील साई समर्थ चरण । संकट निवारण अविलंबें ॥ ४६ ॥
धनेच्छूस लाभेल धन । शुद्ध व्यवहारीं यश पूर्ण ॥
फळ येईल निष्ठेसमान । येईना भावाविण अनुभव ॥ ४७ ॥
आदरें करितां ग्रंथवाचन । साई समर्थ सुप्रसन्न ॥
करी अज्ञान दारिद्र विच्छिन्न । ज्ञानधन संपन्नता देई ॥ ४८ ॥
ग्रंथरचनीं साई संकेत । तैसेंच तयाचें शुभमनोगत ॥
होईल जो तच्चरणानुरक्त । धन्य त्या जीवित भक्तांचें ॥ ४९ ॥
चित्त करुनियां सुसमाहित । नेम निष्ठें हें सच्चरित ॥
वाचावा एक तरी अध्याय नित । होईल अमित सुखदायी ॥ ५० ॥
ज्या मनीं स्वहित विचार । तेणें हा ग्रंथ वाचावा सादर ॥
जन्मो जन्मीं साईचे उपकार । आनंद निर्भर आठवील ॥ ५१ ॥
गुरु पौर्णिमा गोकुळअष्टमी । पुण्यतिथी रामनवमी ॥
या साईच्या उत्सवीं नियमीं । ग्रंथ निजधामीं वाचावा ॥ ५२ ॥
जैसा जैसा संग चित्ती । तैसी तैसी जन्म प्राप्ती ॥
अंते गती जैसी मती । शास्त्र संमती या लागीं ॥ ५३ ॥
भक्तांचा आधार श्री साई । त्याविण दिठे न पडती ठायीं ॥
लेंकुरालागीं कनवाळू माई । येथ नवलाई काय ती ॥ ५४ ।

काय यानूं कथा या परती । शब्दाची जेथें पावती उपरती ॥
वाटे रहावें मौनवृत्ती । योग्य स्तुती ती हीच ॥ ५५ ॥
तरी तीव्र मोक्षेच्छा मनीं धरून । शुभ कर्मेच नित्य करून ॥
श्रवणादि नवविध भक्तिचें सेवन । केलिया शुद्धांतःकरण होईल ॥५६॥
हें न सद्गुरू प्रसादावीण । तयाविण ना पर तत्वज्ञान ॥
म्हणोनि त्यांचें नित्य स्मरण । गुरूनिष्ठा प्रवण तो होय ॥ ५७ ॥
संबंध जैसा पितापुत्र । गुरू हे उपमा नाममात्र ॥
पिता करी इहसुखा पात्र । गुरू इहामुत्र सुखदाता ॥ ५८ ॥
पिता अर्पील क्षणिक वित्त । गुरू अर्पील क्षयातीत ॥
अविनाश वस्तु करिल प्रतीत । अपरोक्ष हातांत देईल ॥ ५९ ॥
माता नऊ मास पोटीं धरी । जन्म देता घाली बाहेरी ॥
गुरु मातेची उलटी परी । बाहेरिल भीतरीं घालील ॥ ६० ॥
अंतीं गुरू गुरू स्मरण करितां । शिष्य निशंक लाधेल सायुज्यता॥
मग तो स्वयें गुरूनें हाणितां । पूर्ण अम्हता लाधेल ॥ ६१ ॥
गुरूकरिंचा आघात । करील जन्ममरण निःपात ॥
गुरूकरिलां देहाचा अंत । कोण मग भाग्यवंत या परता ॥ ६२ ॥
खड्ग तोमर फरश शूळ । इत्यादि हातीं घ्यावें लागेल ॥
आघात पडतां शुद्धि असेल । मूर्ती मग दिसेल सद्गुरूची ॥ ६३ ॥
कितीही करा देहाचें जतन । केव्हांतरी होणार पतन ॥
मग तयाचें गुरू हस्तें हनन । पुनर्जनन हारक ॥ ६४ ॥
मारा मरेमरेंतो मार । छेदा माझा समूळ अहंकार ॥
जेणें न पुनर्जन्म येणार । ऐसा मज दुर्धर घा मार ॥ ६५ ॥
जाळा माझें कर्माकर्म । निवारा माझें धर्माधर्म ॥
जेणें मज होईल सुख परम । ऐसा मोहभ्रम छेदावा ॥ ६६ ॥

घालवा माझे संकल्प विकल्प । करावें मज निर्विकल्प ॥
पुण्यही नको नको मज पाप । नको हा उद्व्याप जन्माचा ॥ ६७ ॥
जातां शरण रिघावयास । तव तूं उभा मी बाजूस ॥
पूर्व पश्चिम अवघ्या दिशांस । अधोर्ध्व आकाश पाताळीं ॥ ६८ ॥
अवघ्या ठायीं तुझा वास । तरी मज माजीही तुझा वास ॥
किंबहुना मी तूं हा भेदाभास । मानितां सायास मज वाटे ॥ ६९ ॥
म्हणून हेमाड अनन्य शरण । दृढ धरी सद्गुरुचरण ॥
चुकवी पुनर्जन्ममरण । ऐसें निजोद्धरण संपादी ॥ ७० ॥
ही काय थोडी कृति अघटित । भक्त उद्धराया असंख्यात ॥
निर्माण केलें हें निजचरित । हेमाड निमित्त करूनियां ॥ ७१ ॥
हें श्री साई समर्थ चरित । व्हावें मज हातें हें अघटित ॥
ना तो साई कृपे विरहित । पामरा मज अघटित हें ॥ ७२ ॥
नाहीं फारा दिसांचा सहवास । नाहीं संत ओळखण्याचा अभ्यास ॥
अंगीं न शोधक दृष्टीचें साहस । देखणें अविश्वासपूर्वक ॥ ७३ ॥
कधीं न केली अनन्यभावें उपासना । कधीं न क्षणभर बैसलों भजना ।
ऐसिया हस्तें चरित लेखना । करवूनियां जनां दाविंयलें ॥ ७४ ॥
साधावया निजवचनार्थ । साईच आठवूनि देती हा ग्रंथ ॥
पुरवूनि घेती हा निजकार्यार्थ । हेमाड हा व्यर्थ नांवाला ॥ ७५ ॥
मशकें काय उचलावा मेरू । टिटवी जैं उपसावा सागरू ॥
परी पाठीं असतां सद्गुरू । अद्भुत करणी घडवितो ॥ ७६ ॥
असो आतां श्रोते जन । करितों तुम्हांस अभिवंदन ॥
जाहला हा ग्रंथ संपूर्ण । साई समर्पण साईचा ॥ ७७ ॥
श्रोतृवृंदा सान थोरां । माझें लोटांगण एकसरा ॥
तुमचेनि धर्मे या कथासत्रा । साईचरित्रा संपविलें ॥ ७८ ॥

मी कोण येथें सेवविणार । हा तरी व्यर्थ अहंकार ॥
येथें साई सूत्रधार । तेथें हें म्हणणार मी कोण ॥ ७९ ॥

तरी त्यागूनि अभिमान मूळ व्याद । गावें निजगुरु गुणानुवाद ।
मनोज्ञा त्या या बोधमद । ऐशिया वाग्यज्ञां संपवितों ॥ ८० ॥

येथें पूर्ण झाला हा ग्रंथ । पूर्ण झाला माझा मनोरथ ॥
पूर्ण झाला साई कार्यार्थ । मीहि कृतार्थ जाहलों ॥ ८१ ॥

ऐसा ग्रंथ अध्यायितां संपूर्ण । मनः कामना होतील पूर्ण ।
हृदयीं धरिल्या सद्गुरुचरण । होइल उत्तीर्ण भवसागर ॥ ८२ ॥

रोगिया होय आरोग्य । दरिद्री होय धनाढ्य ।
संकल्प विकल्पा येइ स्थैर्य । दीना औदार्य लाभेल ॥ ८३ ॥

पिशाच बाधा अपस्मार । ग्रंथा वर्तनें होतील दूर ॥
मूक अपंग पंगु बधिर । तयांही सुखकर हे श्रवण ॥ ८४ ॥

जो शक्तिमान् परमेश्वर । तयाचा जयांस पडला विसर ॥
ऐसे जे अविद्या मोहित नर । होईल उद्धार तयांचा ॥ ८५ ॥

नर असून असुराचार । करून मिथ्या दवडिती शरीर ॥
संसारा मानिती सुखाचें आगर । होईल उद्धार तयांचा ॥ ८६ ॥

अगाध साईनाथांची करणी । हेमाड नितीयीं ( ? ) स्थापिला चरणीं ॥
तयाला निजसेवेसि लावुनी । सेवाही करवूनि घेतली ॥ ८७ ॥

शेवटीं जो जगच्चालक । सद्गुरु प्रबुद्धि प्रेरक ॥
तयाच्या चरणीं अमितपूर्वक ( ? ) । लेखणी मस्तक अर्पितों ॥ ८८ ॥

॥ श्रीसाईनाथार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥



कै. हरी सीताराम दिक्षीत

Lakshmi Art. Bombay, 8,